सन २०१७-१८ करीता इको टुरि झम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांच्या विकास कामांकरिता निधी वितरण. (२४०६ २२९५)

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : निसप-२०१७/ प्र.क्र.१३२)/फ- ५

मंत्रालय, मुंबई -४००० ०३२

दिनांक :- ५ आक्टोबर २०१७

वाचा - १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्रं. कक्ष-१/ पी/यो/ नबाप्र /प्र.क्र.१५/१०१९/२०१७-१८,दि. १९/८/२०१७

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्रं. कक्ष-१/ पी/यो/नबाप्र/प्र.क्र१५/१०५७/२०१७-१८,दि. ३१/८/२०१७

३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४/अर्थ-३ दि.३०/६/२०१७.

प्रस्तावना -

अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी संदर्भाधीन पत्रान्वये सन २०१७-१८ करिता इको टुरीझम राज्य योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत औरंगाबाद व अमरावती या वनवृत्तातील पर्यटन स्थळांच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये शिफारशीसह सादर केला आहे.

शासन निर्णय दि. २८.०१.२०१६ अन्वये महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या उपविधी नियमांना मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या कार्यकारी समितीने प्रस्तावित सर्व पर्यटन स्थळाच्या विकास कामांना निधी उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली आहे.

राज्य योजना सन २०१७-१८ करीता इको टुरीझम (राज्य) योजनेंतर्गत वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांचा विकास (२४०६-२२९५) या योजनेअंतर्गत रू.८०००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित आहे. या निधीतून प्रस्तावित पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी निधी मंजुर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता .

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी प्रस्तावित केल्यानुसार औरंगाबाद व अमरावती या वनवृत्तातील पुढील दोन पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी **रु.३६७.७५ लक्ष (तीन कोटी सदुसष्ठ लक्ष पंच्याहत्तर हजार)** इतक्या रक्कमेस पुढीलप्रमाणे उद्दिष्ट निहाय खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	पर्यटन स्थळाचे नाव	०२ मजुरी	२१ पुरवठा व सामग्री	५० इतर खर्च	एकूण
६	वेरुळ वनउद्यान, जि. औरंगाबाद	रु. ८१.१६	रु. ४०.५७	रु. ४०.५७	रु. १६२.३०
९	ऑक्सीजन पार्क वडाळी, अमरावती	रु. १०२.७३	रु. ५१.३६	रु. ५१.३६	रु. २०५.४५
	एकूण	**रु. १८३.८९**	**रु. ९१.९३**	**रु. ९१.९३**	**रु.३६७.७५**

सदरहू शासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये नमुद केलेली विकास कामे करण्यासाठी उपरोक्त निधी खर्ची टाकण्यात यावा.

२. शासन निर्णय संदर्भ क्र. ३ दि. १ डिसेंबर २०१६ अनुसार नियम पुस्तिकेच्या परिच्छेद ४.१ मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रु. तीन लाख व त्यापेक्षा अधिक असल्यास ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

३. उपरोक्त खर्च विहीत कार्यपद्धतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. प्रस्तावित कामातील बालोद्यान सुशोभीकरण, निरीक्षण मनोरा, माहिती फलक इ. कामांमध्ये निसर्गपूरक असलेले साहित्य (उदा.बांबू इ.) चा जास्तीत जास्त वापर करावा त्या अनुषंगिकच निधी खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी.

५. प्रस्तावित सर्व कामांना सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी आहे याची खात्री करुनच कामे करावीत. तसेच सदरहू कामे करताना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुद्धा दक्षता घ्यावी.

६. शासन निर्णयात नमुद कामासाठी इतर स्त्रोतातुन निधी घेण्यात येणार नाही व कामाची द्विरुक्ती होणार नाही याचे प्रमाणपत्र उपयोगिता प्रमाणपत्रासोबत द्यावे त्याशिवाय पुढील निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. सदर प्रस्तावांतर्गत करावयाच्या कामाचा खर्च **रु.३६७.७५ लक्ष (तीन कोटी सदुसष्ठ लक्ष पंच्याहत्तर हजार)** सन २०१७-१८ साठी मागणी क्र. सी-०७-२४०६ वनीकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक

योजनांतर्गत योजना (०२)(०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सदरहू शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४/अर्थ-३ दि.३० जून २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००५१७३११२७९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2017.10.05 17:28:35 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

(१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर
(४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
(४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद व अमरावती
(५) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
(६) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद व अमरावती
(७) कक्ष अधिकारी (व्यय-१०)(विनियम)/, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(८) ब-१/फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग ,मंत्रालय, मुंबई.
(९) निवड नस्ती, फ-५

शासन निर्णय क्रमांक :निसप-२०१७/ प्र.क्र. १३२ /फ- ५ दि. ५ आक्टोबर २०१७ सोबतचे विवरणपत्र

१. वेरुळ उद्यान ता. खुलताबाद जि.औरंगाबाद.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	कार्यान्वीत यंत्रणा	कामाचा तपशिल	परिमाण	अंदाजपत्रकीय रक्कम
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद	चेनलिंग कुंपन (शिल्लक कामे)	--	३.७२
२		वृक्ष व वेलीची तसेच मेरु वनस्पतीची लागवड करणे (द्वितीय वर्ष कामे)	--	४.००
३		पुल तथा सिमेंट बंधारा (ब्रीज कम सिमेंट बंड)	--	३५.२५
४		विहीर खोदणे-१	--	१५.३५
५		प्रसाधन गृह/स्वागत कक्ष इत्यादी	--	९७.७४
		एकुण :-	**--**	**१५६.०६**
		४ टक्के आर्कीटेक्ट फी खर्च	--	६.२४
		एकुण:-	**--**	**१६२.३०**

२.ऑक्सीजन पार्क वडाळी अमरावती ,वन विभाग.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	कार्यान्वीत यंत्रणा	कामाचा तपशिल	परिमाण	अंदाजपत्रकीय रक्कम
१	मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) अमरावती	ऑक्सीजन पार्कमध्ये निरीक्षण करण्या करीता मुरमाचे निरिक्षण पथ (कच्चा रस्ता) निर्माण करणे.	३०० मीटर	८.८९
२		ऑक्सीजन पार्कमध्ये पर्यटकांना शैक्षणिक माहिती होण्याच्या दृष्टीने निसर्ग पाऊलवाट तयार करणे.	७५० मीटर	**१४.६३**
३		पर्यटकांना विश्रांती साठी पॅगोडा निर्माण करणे.	०१ मीटर	३.०५

४		लहान मुलांना निसर्ग शिक्षण घेण्यासाठी मुरमांचा ओटा तयार करुन शिक्षण परिसर निर्माण करणे.	**२५० मीटर**	**१३.१२**
५		लहान मुलांना निसर्ग शिक्षण घेण्यासाठी खोल जागा मुरमांने भरुन एक लेव्हल शिक्षण परिसर करणे.	**२३४० घ. मी. भराई**	**१४.६०**
६		ऑक्सीजन पार्कला पक्की भिंत आवश्यक असल्यामुळे चेनलिंक फेंन्सीगचे बळकटीकरण करणे.	**१३० मीटर**	१०.८८
७		निसर्ग पाऊलवाटेला एका बाजुने सरंक्षण भिंत घेऊन सुशोभित करणे.	**२७५ मीटर**	**११.३४**
८		दोन्ही बाजुने नाली बांध करुन दोन्ही बाजुस संरक्षण भिंत बाधणे.	**२८० मीटर**	**१४.५६**
९		पर्यटकांना विश्रांती घेण्यासाठी झाडासभोवताल ओटा बाधणे.	**०१ नग**	**१.११**
१०		निसर्गशिक्षण व निसर्गाचे निरिक्षण करण्याकरिता केबद्वारे तरंगता रस्ता २० फुट उंची वर	**०१ नग**	**२२.४८**
११		ऑक्सीजन पार्कमध्ये लावण्यात येणाऱ्या १३०० झाडांना ड्रिप द्वारे पाणी देणे.	**१५३०० मीटर**	**४.५४**
१२		जास्तीत जास्त ऑक्सीजन देण्याऱ्या (वडा, पिपळ,निम,बिहाळा,मोहा,चिंच) रोपांची लागवड करणे.	**१२२५ रोपे**	**९.५३**
१३		ऑक्सीजन पार्क मध्ये कॅक्टस प्लॉट तयार करणे.	**४०० रोपे**	**५.८५**
१४		निसर्ग शिक्षण परिसरामध्ये लॉन लावणे.	**३६०० चौ.मी.**	**८.८२**
१५		ऑक्सीजन पार्कमध्ये पर्यटकांवर लक्ष ठेवण्यास साठी व सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन सि. सि.टि.व्हि. यंत्र बसविणे.	**५ एकर**	**१.५०**
१६		ऑक्सीजन पार्कमध्ये दोन युनिटचे महिला व पुरुषांसाठी प्रत्येकी दोन युरिनल खरेदी करुन बसविणे.	**०४ नग**	**६.१३**

१७		ऑक्सीजन पार्क मध्ये पर्यटकांच्या सुरक्षेच्या इद्दष्टीने सोलर स्ट्रीट लाईट खरेदी करणे.	**९० नग**	**१५.८८**
१८		ऑक्सीजन पार्कमध्ये मुख्य जागी हायवा सोलर खरेदी करणे.	**२५ नग**	**१४.२५**
१९		ऑक्सीजन पार्कमध्ये ०५ हार्सपॉवरचे सोलर मोटारपंप झाडांना ड्रिप व्दावरे पाणी देण्यासाठी खरेदी करणे.	**०१ नग**	**५.५३**
२०		ऑक्सीजन पार्कमध्ये पर्यटकांना वन्यप्राण्यांची माहिती व्हावी या करिता वन्यप्राणी प्रतिकृती तयार करणे.	**१५ नग**	**६.५०**
२१		ऑक्सीजन पार्कमध्ये पर्यटकांना विविध पक्षांची माहिती व्हावी या करीता पक्षांच्या प्रतिकृती तयार करणे.	**१५० नग**	**४.५१**
२२		ऑक्सीजन पार्कमध्ये ०१ महिला रुपी झाड तयार करुन झाडांना शाळेचे लहान विद्यार्थी पाणी देत आहे व झाडांच्या फांद्यांना बाळरुपी फांदी तयार करणे.	**०१ नग**	**२.९६**
२३		वन्यप्राण्यांची माहिती व्हावी या करिता चित्ररुपी फलक तयार करणे.	**६० नग**	**४.७९**
		एकुण :-		**२०५.४५ लक्ष .**